महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ८९ वा | दिनांक : ०१/०१/२०२५ | वार : बुधवार

## शहर पाणीपुरवठा योजना : संयुक्त तांत्रिक पाहणी करुन अहवाल सादर करावा - इ.मा.व.कल्याण मंत्री अतुल सावे



**छत्रपती संभाजीनगर, (जिमाका):-** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या दोनही विभागांनी पैठण ते छत्रपती संभाजीनगर रस्ता व त्याच रस्त्यालगत होत असलेल्या शहर पाणीपुरवठा योजनेच्या कामाची मनपा समवेत संयुक्त तांत्रिक पाहणी करावी व अहवाल सादर करावा. पहिल्या टप्प्यात मार्च मध्ये पाणीपुरवठा सुरु होईल असे नियोजन करावे, असे निर्देश इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण, तसेच दुग्धविकास व उर्जा नुतनीकरण मंत्री अतुल सावे यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात शहर पाणीपुरवठा योजनेच्या प्रगतीबाबत आज बैठक पार पडली. राज्याचे इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण, तसेच दुग्धविकास व उर्जा नविनीकरण मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान पाटील भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, विधानसभा सदस्य आ. अनुराधा चव्हाण, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, मजिप्राच्या मुख्य अभियंता मनिषा पलांडे, कार्यकारी अभियंता दीपक कोळी, मनोज पाठक मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे अनिकेत कुलकर्णी, जेव्हीपीआर कंपनीचे जी.मेहंदर, खलील अहमद, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य अभियंता रवींद्र इंगोले, महानगरपालिकेचे अभियंता ए. बी. देशमुख, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंता किरण पाटील यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी पाणीपुरवठा योजनेचे कामकाज करणारे कंत्राटदार आणि शेतकरी बैठकीस उपस्थित होते. बैठकीत प्रारंभी मजीप्रातर्फे माहिती सादर करण्यात आली. त्यानुसार, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत शहर पाणीपुरवठा योजनेला २०१९ मध्ये मान्यता मिळाली.

या योजनेचा अमृत २.० योजनेत समावेश करुन त्यास सुधारीत मंजूरी घेण्यात आली. आता पर्यंत १८०८ कोटी ३९ लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झाला असून आतापर्यंत १५८३ कोटी ३२ लक्ष रुपये इतका निधी खर्च झाला आहे.याअंतर्गत उद्धव विहिरीच्या (जॅकवेल) उभ्या भिंतीचे काम ११.९ मिटर उंचीपर्यंत पूर्ण झाले असून वर्तुळाकार भिंतीचे २२.७ मिटर उंचीचे काम पूर्ण झाले आहे. उपांग कामांमध्ये पुलाचे काम ७५ टक्के पूर्ण आहे. पाईपलाईन अंथरण्याचे काम ८८ टक्के पूर्ण झाले आहे. जलाभिसरण कारंजाचे आरसीसी काम ९० टक्के, आऊटलेट चेंबर ७२ टक्के पूर्ण, सीएलफचे काम ९५ टके पूर्ण,पम्प हाऊस व केमिकल हाऊसचे काम अनुक्रमे ७० व ७५ टक्के पूर्ण झाले आहे.

या शिवाय ४७ उंच जलकुंभ व ३ बैठे जलकुंभ असे एकूण ५० जलकुंभ तयार करण्यात येणार आहेत. त्यातील ७ उंच जलकुंभ पूर्ण झाले आहेत. २ बैठे जलकुंभ पूर्ण झाले आहेत. उर्वरीत जलकुंभ ९० टक्क्यांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. पूर्ण झालेल्या जलकुंभांच्या कार्यक्षेत्रे घरगुती जोडण्यांचे कामेही सुरु आहेत,अशी माहिती देण्यात आली.राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत रस्त्याच्या कामाबाबत माहिती सादर करण्यात आली.

या योजनेसाठी पैठण ते छत्रपती संभाजीनगर या रस्त्यालगत ८ मिटर अंतरापर्यंत अस्तित्वातील १२०० मिमी पाईप लाइनच्या बाजूने नवीन २५०० मिमी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु आहे. जमिनीखाली मंजूर पाईप लाईन टाकल्यास व त्यावरुन रस्ता गेल्यास भविष्यात पाईपलाईनची देखभाल करण्याविषयी निर्माण होऊ शकणाऱ्या प्रश्नांबाबत व याबाबतच्या तांत्रिक शक्यतांवर चर्चा करण्यात आली. श्री. सावे म्हणाले की, रस्त्याचे व जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर जलवाहिनीची देखभाल दुरुस्ती करतांना रस्ता खोदावा लागू नये. यासाठी कार्यान्वयन यंत्रणा व मनपा या तिघाही यंत्रणांनी मिळून संयुक्त तांत्रिक पाहणी करावी. येत्या चार दिवसात त्याचा अहवाल सादर करावा.

येत्या मार्च पर्यंत पहिल्या टप्प्यातील २०० दलघमी पाणी शहराला पुरवठा करावे,असे निर्देश श्री. सावे यांनी दिले. तसेच या कामाची हायड्रॉलिक तसेच रेडिओग्राफिक चाचणी घेतल्यानंतरच संबंधित ठेकेदाराचे देयक अदा करावे,अशी सुचनाही श्री. सावे यांनी दिली.ही योजना आगामी ५० वर्षांसाठी तयार करण्यात आली असून आगामी कालावधीत कोणत्याही अडचणी निर्माण होऊ नये याबाबत उपाययोजना कराव्या.

लोकांना पाणी मिळावे, पैठणकडे जाणारी तसेच बिडकीन व चितेगाव या रस्त्यालगतच्या गावातील रहदारी सुरळीत व्हावी, याद्दष्टीने उपाययोजना कराव्या,असे निर्देश खा. संदिपान भुमरे यांनी दिले.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की. कार्यान्वयन यंत्रणांनी आपापसात समन्वय राखून काम वेळेत पूर्ण करावे. मनपा आयुक्त जी.श्रीकांत यांनी या योजनेचे काम पूर्ण करुन शहरवासियांना पाणीपुरवठा करणे हेच मनपाचे प्राधान्य असून त्यासाठी सर्व कार्यान्वयन विभागांनी मिळून संयुक्त प्रयत्न करावे,असे सांगितले.




## जल जीवन मिशन योजना सोलारायझेशनवर आणा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**मुंबई :** जल जीवन मिशन योजना ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेत राज्याचा सहभाग अधिक दिसावा यासाठी योजनेची कामे मिशन मोडवर करून ही योजना संपूर्ण सोलारायझेशनवर आणावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जलजीवन मिशन योजनेतून घेण्यात येणाऱ्या योजनांचे सोलारायजेशन झाल्यास वीज बरोबरच वीज बिलात बचत होईल. यासाठी विभागाच्या अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन एक सर्वसमावेशक आराखडा तयार करावा.

नल जल मित्र या योजनेसाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री कौशल्य विकास योजनेतून या तरुणांना प्रशिक्षण देण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथी गृह पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या पुढील १०० दिवसाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला. या बैठकीस आदिवासी विकास मंत्री अशोक उइके, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पाणीपुरवठा आणि स्वच्छता राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव संजय खंदारे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे आणि संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ जानेवारी २०२५


## महाराष्ट्र उद्योजकता विकास विभाग व शिवाजी महाविद्यालय वाणिज्य विभागाच्या वतीने महिलांसाठी आरीवर्क प्रशिक्षण संपन्न



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र धाराशीव आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी १५ दिवसाच्या आरीवर्क प्रशिक्षणचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणात ३० महिलांनी सहभाग घेतला.

आधुनिक बदलत्या फॅशन नुसार शहरी आणि ग्रामीण महिलांची वाढत्या मागणी विचारात घेऊन महिलांसाठी आरीवर्क प्रशिक्षण उपयुक्त ठरेल अनिष्ट रोजगार संधी उपलब्ध करील असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यानी केले.शिवाजी महाविद्यालयात या प्रशिक्षणाचा समारोप झाला यावेळी अध्यक्षीय समारोपात डॉ अस्वले यानी महिलांनी प्रशिक्षण घेऊन स्वावलंबी व्हावे असे आवाहन केले.

यावेळी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र धाराशीव चे प्रकल्प अधिकारी पांडुरंग मोरे यांनी प्रशिक्षित महिलांना उद्योग उभारणीस सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रोग्राम समन्वयक सतीश चव्हाण यांनी सहकार्य केले. या समारोपात श्री अशोक चव्हाण यांनी प्रशिक्षित महिलांनी व्यावसाय उद्योग कसा करावा याचा मंत्र देतांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणार्थी महिलांनी बनवलेल्या. आरीवर्क ला रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.यामध्ये प्रथम क्रमांक भारती चौगुले, द्वितीय क्रमांक अशादेवी सोनकवडे, तृतीय क्रमांक शिल्पा गायकवाड आणि उत्तेजनार्थ अंकिता पाटील व ज्योती अंकुश यांना मिळाला आहे.प्रशिक्षका ज्योती पवार यानी महिलांना प्रशिक्षण दिले.

या प्रशिक्षणा साठी वाणिज्य विभागाचे डॉ अजित अष्टे, प्रा. खंडू मुरलीकर, प्रा. अक्षता बिरादार, प्रा. विद्या गायकवाड, प्रा. संध्याराणी चौगुले, प्रा. विद्या गायकवाड प्रा. राणी बेंबलगे, प्रा. अंजली चव्हाण यांनी सहकार्य केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com


# नवीन वर्ष




**कवी**
**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
+९१ ९४२१२४५३०९


आज नवीन वर्ष,
नवा दिवस,
नवी तारीख,
नवा विचार,
सगळे-सगळे नवे -नवे,
जुने जाऊ विसरून सारे,
सुख असेल नाहीतर दुख,
नवीन विचारांची फुटु देत पालवी,
नवा बहर येऊ दे!

काल घेतली शपथ मी,
मैत्री करू सगळ्या सोबत,
कोणी असेल भाऊ,
कोणी असेल दादा,
माता पिता गुरु समान
सगळ्याना प्रेम देऊ,

सगे -सोयरे मित्र सारे,
मित्रा सारखेच राहू,
नव्या वर्षात,नव्या दिवसात पुन्हा एकत्र येऊ !

चुकले -हुकले क्षमा असावी,
क्षमा करण्याची बुध्दी येऊ दे,
वर्षे नवे हे,नवेच सारे,
येथे नवेच सारे होऊ दे,
माणूस आहोत आपण सारे,
याची जाणीव होऊ दे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ जानेवारी २०२५


## कन्नड शहरात घाणीचे साम्राज्य, ढोल बजाओ आंदोलनाचा ईशारा




**कन्नड (अरुण थोरात):** शहरातील विविध भागांत घाणीचे साम्राज्य पसरल्याने शिवसेना ठाकरे गटाचे वतीने दि. ३० डिसेंबर रोजी तहसील कार्यालय कन्नड येथे तहसीलदार यांना एक निवेदन देऊन आंदोलनाचा ईशारा देण्यात आला आहे. कन्नड नगरपरिषद हद्दीतील नागरिकांच्या समस्या दूर करण्यास केली विनंती. मुख्याधिकारी कार्यालयीन वेळात कार्यालया मध्ये न भेटल्यामुळे शिवसैनिकांनी तहसीलदार यांच्याकडे धाव घेतली.

शिवसेना शहर प्रमुख डॉ सदाशिव पाटील यांचे अध्यक्ष खाली तहसीलदार कडवकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या सहा महिन्यापासून कन्नड शहराची दुरवस्था झाली आहे. नगरपालिका प्रशासनाने याकडे लक्ष दिले नाही. शहरातील गल्लोगल्ली घाणीचे साम्राज्य पसरला आहे. पिण्याचे पाण्याचे नियोजन नाही. स्वच्छ पाणी येत नाही. नळपट्टी संपूर्ण वर्षाची घेतात. परंतु महिन्यातून तीन ते चारच वेळेस पाणी येते. त्यामुळे नळपट्टी कमी करण्यात यावी. शहरवासीयांना स्वच्छ व नियमित पाणी देण्यात यावे.

संपूर्ण शहरातील पाईपलाईन जागोजागी फुटलेली आहे ती दुरुस्त करण्यात यावी. नगरपालिका चे पाईप लाईनचे वाल दुरुस्त करून पाणी वेळेवर देण्यात यावे. पथदिवे चालू करण्यात यावे. कन्नड शहराचे मुख्य प्रवेशद्वारावर पिशोर रोड, हिवरखेडा रोड, चाळीसगाव रोड, मकरंदपुर रोड, माळीवाडा बाजार पट्टी या रोडवर घाणिचे साम्राज्य आहे.

कन्नड नगरपालिका हद्दीतील मुख्य रोडवर बाजारपेठ मध्ये मोकाट जनावर बसलेली असतात. सर्व राजकीय पक्षाने निवेदन देऊन सुद्धा कारवाई का होत नाही. असे या या निवेदनात विचारणा करण्यात आलेली आहे. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावा. चाळीसगाव रोड ते कन्नड बस स्टँड, मकरंदपुर पूल व पिशोर नाका ते पिशोर रोड टेलिफोन ऑफिस या ठिकाणी डीवाईडरच्या दोन्ही बाजूने घाण व माती साचलेली आहे ती स्वच्छ करण्यात यावी.

नसताच शिवसेना ठाकरे गटाचे वतीने झोपी गेलेल्या नगरपालिका प्रशासनाला जागी करण्यासाठी ढोल बजाव आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळेस डॉ सदाशिव पाटील यांनी दिला. या निवेदनावर शिवसेना शहर प्रमुख डॉ सदाशिव पाटील, उपतालुका प्रमुख शिवाजी थेटे, कामगार आघाडीचे शहराध्यक्ष किसन भालेराव, उपशहर प्रमुख चंद्रकांत लाडे, सलमान शेख, हिंदराज लकवाल, सचिन काळे, लक्ष्मीकांत सुरे, विभाग प्रमुख प्रकाश काचोळे, उदय सोनवणे, सागर सोनवणे, नाना वाळुंजे, राम राजपूत, प्रवीण राठोड, भाऊसाहेब सूर्यवंशी, गणेश मोरे यांच्या स्वाक्षरी आहे.

## कन्नड तालुका पालक क्रीडा स्पर्धेचे थाटात उद्घाटन



**कन्नड (अरुण थोरात):** पंचायत समिती शिक्षण विभागामार्फत आयोजित तालुकास्तरीय स्पर्धेचं उद्घाटन करण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर विकास मीना यांच्या संकल्पनेतून आयोजित तालुकास्तरीय पालक व विद्यार्थी क्रीडा स्पर्धा कन्नड येथे आयोजित करण्यात आल्या होत्या त्यात महिला व पुरुष गटात कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, क्रिकेट तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारात धावणे, गोळा फेक, थाळीफेक एक खेळ घेण्यात येईल.

स्पर्धेचे उद्घाटन संतोष गोरड उपविभागीय अधिकारी कन्नड व विद्याचरण कडवकर साहेब तहसीलदार कन्नड विस्तार अधिकारी डी. डी. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी तालुका क्रीडा संकुल सदस्य प्रवीण शिंदे, केंद्र प्रमुख बाजीराव ताठे, लक्ष्मण ठुबे, बाळू गायकवाड, सीताराम आहेर, कौतीक सपकाळ, नामदेव चव्हाण, योगेश मुळे आदींची उपस्थिती होती काही स्पर्धेचा निकाल, महिला गटात खो खो स्पर्धेत प्रथम क्रमांक पिशोर (गुण १४-१) व द्वितीय क्रमांक देवगाव संघाने पटकावला.

कब्बडी स्पर्धेत प्रथम क्रमांक कन्नड व या द्वितीय क्रमांक चिंचोली या दोन्ही संघांनी अंतिम स्पर्धेत प्रवेश केला. या स्पर्धेला पंच म्हणून शाम खोसरे, विजय बारवाल, राकेश निकम, मुक्तानंद गोसावी, रवी कुमार सोनकांबळे, वसीम शेख, योगेश पाटील, स्वाती रोकडे, मनीषा पाटील स्वाती पाटील, विशाल दांडेकर, एजाज शहा, हिरालाल चित्ते बंड्या अमोल खरात यांनी काम पाहिले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002




